वाचले

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ५ (१) व १९ (१)
२. आदेश क्र.नासुके/१/कावि/७०५/२०१३ दि.०६/११/२०१३
३. आदेश क्र.प्रशा/१/कावि/३४७/२०१६ दि.२/६/२०१६
४. मा.आयुक्तसो यांनी मान्य केलेला दि. ७/७/२०१६ चा प्रस्ताव.

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

माहितीचा
अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुके/१/कावि/२५८/२०१६
दिनांक ७/७/२०१६

विषय :- <u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५</u>
जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करणेबाबत.
(बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग)

आदेश,

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(१) व १९ (१) मधील तरतूदीनुसार वाचले क्र.२ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणाच्या विविध विभागांसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित करण्यात आले आहे. बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागासाठी या आदेशान्वये उपशहर अभियंता यांना जन माहिती अधिकारी आणि शहर अभियंता यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेत आले आहे.

वाचले क्र.३ अन्वये शहर अभियंता पदाचे कामकाज वाटप करण्यात आलेले आहे. या आदेशान्वये बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागात कार्यकारी अभियंता यांच्या कामकाजात समन्वय राखण्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून श्री.अय्युबखान पठाण, उपशहर अभियंता यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

सबब, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडील माहिती अधिकार विषयक कामकाज जलदगतीने पार पाडावे आणि नागरिकांना माहिती शिघ्रतेने उपलब्ध व्हावी, प्राप्त अपिलांवर उचित कार्यवाही व्हावी म्हणून, या अधिनियमातील तरतूदी विचारात घेऊन, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागासाठी उपअभियंता यांना जन माहिती अधिकारी आणि समन्वय अधिकारी तथा उपशहर अभियंता यांना प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

संबंधित अधिकारी यांची प्रशासकीय बदली झाल्यास / पद रिक्त असल्यास, बदली झालेल्या किंवा अतिरिक्त पदभार सोपविलेल्या अधिकारी / कर्मचा-यांनी त्या पदास पदनिर्देशित केल्याप्रमाणे कामकाज करावे. कामकाज बदलामुळे किंवा अन्य कारणांमुळे माहिती अधिकारी यांचे पद रिक्त राहिल्यास उपशहर अभियंता यांनी माहितीच्या अधिकाराची व्यवस्थित अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना व कार्यवाही आपल्या स्तरावर करावी.

आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

विभागप्रमुख / संबंधित अधिकारी,
बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

प्रत,

ई गव्हर्नन्स विभाग.

२/- प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने मनपा वेबपोर्टलवरील माहिती अद्ययावत करावी.

प्रशासन अधिकारी,(ना.सु.कें.)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.